# जिल्हाधिकारी कार्यालय बीड

फोन क्र. : ०२४४२-२२२६०४
E-mail : dpobeed@yahoo.com

फॅक्स क्र. : ०२४४२-२२२०११
(नगरपरिषद प्रशासन)

जा.क्र.2016/जिबी/डेस्क-1/एमयुएन/कावि-

दिनांक 10/08/2016

प्रति,
मुख्याधिकारी,
नगर परिषद बीड, अंबाजोगाई, परळी-वै, माजलगांव, गेवराई व धारुर.

विषय :- नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-2016 अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :-1. मा. अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्रमांक-रानिआ/नप-2016/प्र.क्र.10/का-06 दिनांक 15 जून, 2016
2.मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांची सहा पत्रे क्र.2016/नपाप्र/निवडणुक/कावि 136 ते 140 दि.29.7.2016

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी बीड जिल्हयातील बीड, अंबाजोगाई, परळी-वै, माजलगांव, गेवराई व धारुर या नगरपरिषदांच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी अंतिम प्रभाग रचना संदर्भातील महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 10 अन्वये प्रसिध्द करावयाच्या आदेश व अनुसूचीच्या प्रती या सोबत देण्यात येत आहेत.

सदर आदेश व अनुसूची तसेच अंतिम प्रभाग रचना नकाशा परिशिष्ट 1 ते 8 सह आपल्या नगरपरिषद कार्यालयात व नगरपरिषदेच्या संकेतस्थळावर व इतर आवश्यक ठिकाणी दिनांक 11/08/2016 रोजी प्रसिध्द करुन अनुपालन अहवाल त्याच दिवशी सादर करावा.

जिल्हाधिकारी बीड.

प्रत,

1. मा.अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. नियंत्रक अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी नगरपरिषद बीड, अंबाजोगाई, परळी-वै, माजलगांव, गेवराई व धारुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
4. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी (NIC) बीड यांना सर्व सहाही नगर परिषदांचे आदेश व अनुसूची देऊन कळविण्यात येते की, सदर आदेश व अनुसूची जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळावर दिनांक 11/08/2016 रोजी प्रसिध्द करावी.

जिल्हाधिकारी बीड.

# विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद

Fax 0240-2970507 (नगर परिषद प्रशासन शाखा) E-Mail- abdrdma@gmail.com


जा.क्र.2016/नपाप्र/निवडणूक/कावी - 140 दिनांक :- 29.07.2016

प्रति,
जिल्हाधिकारी,
बीड.

**विषय :- किल्ले धारुर, नगर परिषद, जि.बीड येथील सार्वत्रिक निवडणूक-2016 चे अंतिम प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत.**

संदर्भ :-1.मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश क्र.रानिआ/नपा-2016/प्र.क्र.07/का-6 दि.07.05.2016

2.मा.उपसचिव, नगर विकास विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.एमसीओ-2016/प्र.क्र.128/नवि-14 दि.13.06.2016

3.मा.उपसचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे प.क्र.रानिआ/नप-2016/प्र.क्र.10/का-6 दि.15.06.2016

4.मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश व पत्र क्र.रानिआ/नप-2016/प्र.क्र.10 /का-6 दि.15 जून, 2016

5.आपले प.क्र.2016/जिबी/डेस्क-1/एमयुएन/कावी- दि.20.07.2016

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी संदर्भ क्र.3 अन्वये जाहिर केलेल्या कार्यक्रमानुसार बीड जिल्हयातील **किल्ले धारुर** नगरपरिषदेचा प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव आपल्या कार्यालयाने संदर्भ क्र.5 नुसार अंतिम मान्यता मिळणेस्तव या कार्यालयास सादर केलेला आहे.

मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे संदर्भ क्र.1 च्या आदेशान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 चे कलम 10 नुसार नगरपरिषदा व नगरपंचायतीचे प्रभाग रचनेच्या प्रस्तावास अंतिम मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना प्रदान केलेले आहेत.

मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या संदर्भ क्र.4 चे आदेशाद्वारे दिलेल्या निर्देशानुसार संदर्भ क्र.5 अन्वये आपण अभिप्रायासह सादर केलेल्या **किल्ले धारुर**, नगरपरिषदेच्या अंतिम प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

संदर्भ क्र.4 चे आदेशातील निर्देश क्र.17 नुसार व त्यातील परिशिष्ट 1 (क) प्रमाणे आपण **किल्ले धारुर** नगरपरिषदेची मान्य केलेली अंतिम प्रभाग रचना राजपत्रात प्रसिध्द करणेबाबत आयोगाने वेळोवेळी विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन सत्वर पुढील कार्यवाही करावी.

**(डॉ. उमाकांत दांगट)**
विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलिपी :-**

01. अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, नविन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- 400 032.
02. मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, शासकिय परिवहन सेवा इमारत, 3मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी मुंबई-30.
03. मुख्याधिकारी, नगरपरिषद किल्ले धारुर, जि.बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

स्वा

विभागीय आयुक्त औरंगाबाद

करिता